# अंतरलहरी



कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

सप्टेंबर - डिसेंबर २०१९ वर्ष १२ अंक ३ पृष्ठ १२ रु. २/-

## आपण बसवलेला पहिला दगड धर्मशीलतेचा असला पाहिजे

**हे** स्थळ (वसंत विहार) एक हजार वर्ष राहावं, जसं आहे तसंच – अप्रदूषित. स्वत:ला स्वच्छ आणि निर्मळ करणाऱ्या, नितळपणे वाहणाऱ्या एखाद्या नदीसारखं. म्हणजेच इथे कुणाची कुणावरही अधिकारशाही, अंकुश किंवा सत्ता नसेल. इथे अधिकार असेल तो फक्त शिकवणीतील सत्याचा.

हे एक असं ठिकाण असेल जिथे चांगुलपणाला बहर येतो; जिथे संवाद साधताना किंवा सहकार्य देताना कामाचं स्वरूप, उद्दिष्ट किंवा व्यक्ती यांचा विचार न करता मोकळेपणाने सहकार्य दिलं जातं; ते कुठल्याही तत्त्वावर समजुतीवर, श्रद्धेवर किंवा मतावर अवलंबून नसतं.

जी व्यक्ती इथे येईल आणि जे काम स्वीकारेल – उदाहरणार्थ बागकाम किंवा असंच दुसरं एखादं काम – ते काम करताना त्या व्यक्तीला मौलिक आनंदाचा प्रत्यय येईल. मग ती व्यक्ती दुसऱ्या एखाद्या व्यक्तीशी त्याबद्दल बोलेल, तिला प्रश्न विचारून शंका उपस्थित करेल आणि काम करत असताना स्वत:ला गवसलेल्या सत्याची मौलिकता अजमावायचा प्रयत्न करेल. त्यामुळे इथे सतत संवादाला वाव मिळेल; अनुभवांची देवाणघेवाण होत राहील; म्हणूनच, इथे एखाद्या सत्याचाच किंवा जाणीव-जागृतीच्या एखाद्या अनुभवाचाच प्रत्यय न येता, कोणत्याही गोष्टीचा बोध झाल्यावर किंवा कोणत्याही सत्याचा किंवा सत्याच्या अंशाचा प्रत्यय आल्यावर, तो अनुभव सर्वांचा आणि सर्वांसाठी आहे हे लक्षात ठेवलं पाहिजे.

हे ठिकाण म्हणजे एखादा समुदाय, संप्रदाय किंवा सामाजिक गट नाही. समाज किंवा समाज गट हे शब्द खरं तर समग्र किंवा एकसंघ समाजापासून विभाजन करणारे प्रखर शब्द आहेत; पण इथे समग्र जगत किंवा लोकसमुदाय ह्या शब्दांचाही वापर करता येणार नाही. खरं सांगायचं तर कृष्णमूर्तींनी धर्म ह्या संकल्पनेविषयी जे विचार मांडले आहेत, त्यांचा प्रत्यय देणारं असं हे ठिकाण आहे. ही अशी जागा आहे जिथे शारीरिक क्षमता-संवर्धनाबरोबरच शैक्षणिक विकासाकडेही सातत्याने लक्ष पुरवलं जातं. इथे काम करणारी प्रत्येक व्यक्ती शिक्षक आहे आणि विद्यार्थीही आहे.

ह्या जागेची निर्मिती स्वत:ला प्रकाशमान करण्यासाठी किंवा स्वत:च्या कलात्मक, धार्मिक किंवा अन्य उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी करण्यात आलेली नाही. खरं तर, एकमेकांना आधार देऊन आपलं बळ वाढवण्यासाठी आणि सर्वांचा विकास साधण्यासाठी हे स्थळ निर्माण करण्यात आलं आहे.

सनातनी विचार किंवा पारंपरिक चळवळी यापासून ही जागा पूर्णपणे मुक्त असावी; खरं सांगायचं तर इथे पूर्णपणे स्वातंत्र्य असावं; इथे राहणारी माणसं पूर्णपणे मुक्त असावीत; वंशवाद, धार्मिक विचारप्रवाह आणि श्रद्धा यांचा पगडा नसलेली माणसंच इथे असतील. ज्यांना प्रामाणिकपणे आणि नेकीने वागणं जमत नसेल त्यांनी ह्या जागेपासून दूर जाणंच योग्य ठरेल. सखोलपणे विचार केला तर जाणवतं की ज्याचा आपण ज्ञान म्हणून स्वीकार करतो त्या गोष्टीच खरं तर आपल्या शत्रू आहेत.

ही जागा कल्पनाविलासात रंगून जाणाऱ्या, भावुक किंवा हळव्या व्यक्तींसाठी नाही. ज्यांचा मेंदू सतर्कपणे विचार करतो त्यांनी इथे यावं. पण ही जागा केवळ बुद्धिजीवी व्यक्तींसाठी आहे, असंही समजू नका. ज्यांचा मेंदू तर्कशुद्ध पद्धतीने विचार करतो, जे मूलत: स्वत:ला आणि इतरांना समजून घेण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करतात, ज्यांची वृत्ती आणि कृती ह्यामध्ये सुसूत्रता असते अशा व्यक्ती इथे याव्यात अशी अपेक्षा आहे.

संवाद ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. हा अभिव्यक्तीचा एक असा प्रकार आहे ज्यात प्रश्नोत्तरांची देवाणघेवाण होत राहते आणि अशा एका प्रश्नापाशी येऊन थांबते जो अनुत्तरित राहतो. जणू काही प्रश्नोत्तरात गढलेल्या त्या दोन व्यक्तींना जोडणारा तो एक दुवा असतो... अस्पर्शित कळ्यांसारखा! जर अशा प्रश्नाला विचाराचा स्पर्श झाला नाही, तर त्या प्रश्नाला स्वत:चे असे उत्तर मिळते कारण प्रश्नकर्ता आणि उत्तरदाता ह्या दोन्ही व्यक्ती इथे जणू विराम पावतात. हा अशा प्रकारचा संवाद असतो जिथे शोध घेण्याची प्रक्रिया ज्या स्तराला स्पर्श करते त्याची तीव्रता आणि खोली गाठणं विचाराला शक्य होत नाही. हा असा संवाद असतो ज्यात वेगवेगळी मतं, कल्पना यांची सरमिसळ नसते. तर दोन किंवा अधिक व्यक्तींनी – सुजाण व्यक्तींनी – एकत्र बसून घेतलेला हा शोध असतो. इथे प्रश्नाच्या सखोलपणाचा वेध घेत असतानाच अलगदपणे त्याचं नेमकं उत्तर हाती येतं.

ह्या सर्व गोष्टी म्हणजे वैचारिक करमणूक किंवा सैद्धांतिक चर्चा नाही. इथे शब्द हेच कर्म आहे. या दोन्ही गोष्टी सदैव एकत्रच असतात. त्यांची फारकत करू नका. जिथे शब्द हेच कर्म असतं, तिथेच एकात्मता असते.

हे स्थळ अतिशय सुंदर असावं – जिथे झाडं असतील, पक्ष्यांचा वावर असेल आणि शांती-नि:शब्दता यांचा प्रत्यय येईल, कारण सुंदरतेत सत्य असतं, आणि सत्य म्हणजेच चांगुलपणा आणि प्रेम! बाह्य सौंदर्य, बाह्य नि:शब्दता, शांतता ह्यामुळे कदाचित आंतरिक शांतीवरही परिणाम होऊ शकेल, पण बाह्य वातावरणाचा आंतरिक सौंदर्यावर कोणताही प्रभाव पडू नये. जिथे 'स्व' विराम पावतो तिथेच सौंदर्य असतं. बाह्य वातावरण अतिशय रम्य असावं पण मन त्यातच गुंग होऊ नये. एखादा खेळ हातात आल्यावर लहान मूल गुंग होतं तसं होऊ

*(पान २ वर)*

## संपादकीय

सभोवतालच्या वातावरणाचा आपल्या मनावर व शरीरावर आपल्या नकळत निश्चित परिणाम होत असतो. उदाहरणार्थ – तुम्ही ऑफिसच्या चार भिंतीत, अनेक लोकांमध्ये बसून काम करता, ऑफिसर असलात तर तुमच्यासाठी वेगळी केबीन, खोली असेल, पण बाहेर भिंती व आत कामाचा कल्लोळ, मान मोडून सतत काम करत बसण्यापासून काही सुटका नाही. स्वत:साठी सवड नाही.

कधीतरी शहराबाहेर, नदीकाठी, एखाद्या झाडाखाली, मावळत्या सूर्याच्या सौम्य किरणांमध्ये गार वाऱ्याची झुळूक गालाला स्पर्श करून जाते. अशा वेळी आपण जागृत असलो तर जग बदलून जाते, मन शांत होते, पारदर्शक होते आणि आपल्याला आपले खरे स्वरूप पाहण्याची संधी मिळते, बळ मिळते.

'कृष्णमूर्ती अध्ययन केंद्रे' आपल्याला ही संधी देण्याचा प्रयत्न करतात. अशी केंद्रे असावीत असे कृष्णमूर्ती आवर्जून सांगत असत आणि इतर मठ, आश्रम ह्यापेक्षा आपल्या केंद्रात काय वेगळेपण असावे त्याबद्दलही ते बोलत असत.

केंद्रामध्ये बाह्य व्यवस्था असणे महत्त्वाचे आहे. परंतु कृष्णमूर्तींच्या शिकवणीभोवती असलेले कोणते कार्यक्रम कसे राबवले जावेत हा मुद्दा महत्त्वाचा आहे.

कार्यक्रमांमध्ये संवाद असतात, वाद नसतात. पाहुणे, कार्यकर्ते, विश्वस्त अशी विभागणी नसते. ते सहप्रवासी असतात. त्यात सहकार असतो, अधिकार नसतो, त्यात प्रेम असते आणि म्हणूनच तुलना नसते, त्यात भावविवशता नसते, संवेदनशीलता असते. आपण सातत्याने जागरूक राहिलो तरच हे घडू शकते. ह्याची मनोमन जाणीव हवी. सतत जागरूक असणे ही कठीण गोष्ट आहे, पण अशक्य नाही. ह्या गोष्टीचे महत्त्व समजले तर त्याबद्दलच्या आस्थेने तुम्ही प्रयत्न करत राहाल व एक वेगळेच वातावरण निर्माण होईल, ऊर्जा निर्माण होईल. केंद्राच्या प्रवेशद्वारातून आत येणाऱ्याला ती जाणवेल; ह्या जागेत काही प्रगल्भ, उदात्त, प्रेममय असल्याचे जाणवेल. त्या प्रज्ञेची जागृती असेल.

अशा अध्ययन केंद्राबद्दलची कृष्णमूर्तींची भाष्ये अंतरलहरीच्या ह्या अंकामधून मराठी वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न आहे.

*(पान १ वरून पुढे...)*

नये. इथे कोणतीही खेळणी नसतील, उथळपणा नसेल पण आंतरिक सखोलता, सत्त्वशीलता आणि जी विचारांमधून स्फुरलेली नाही अशी एकात्मता असेल.

ज्ञान म्हणजे सौंदर्य नाही. सौंदर्य म्हणजे प्रेम, आणि जिथे ज्ञान असतं तिथे प्रेम नसतं.

जिथे प्रेम आणि अनुकंपा असते केवळ तिथेच प्रज्ञा असते. जिथे मेंदू ठराविक विचारांच्या जोखणीत अडकलेला असतो तिथे करुणा असूच शकत नाही.

सामान्य लोकांचा गट एखाद्या धर्मशील केंद्राची उभारणी करूच शकत नाही. अशा केंद्राच्या उभारणीसाठी लागणारी प्रत्येक गोष्ट करताना उच्चतम दर्जा राखावा लागतो आणि अतिशय उच्च दर्जाच्या मेंदूची गरज असते. सामान्य किंवा साधारण ह्या शब्दांचा खरा अर्थ म्हणजे मंद, जड मेंदू – जो ज्ञानाच्या/माहितीच्या ओझ्यामुळे जड झाला आहे असा मेंदू.

चांगुलपणा किंवा भलेपणा ह्या भविष्यात साध्य करावयाच्या गोष्टी आहेत असे मानणं चुकीचं ठरेल. आपल्याला एखाद्या 'काल्पनिक' राष्ट्राची निर्मिती करायची नाही. आपण इथे खऱ्याखुऱ्या वस्तुस्थितीचा विचार करत आहोत. तुम्ही ह्या सर्व गोष्टींचा 'भविष्यात साध्य करायच्या गोष्टी' म्हणूनही विचार करत असाल. पण भविष्य हे आता – वर्तमानातच आकारत असतं. वर्तमान काळातच भूत आणि भविष्याची, विचार आणि काळ यांचीही उपस्थिती असते. पण जर एखादी व्यक्ती मृत्यूसमवेत राहत असेल – कधी तरी नाही, तर नेहमीच मृत्यूचा सामना करत असेल, तर बदलाला वावच मिळणार नाही. बदल म्हणजे संघर्ष आणि चिंता – त्यामुळे होणारं दु:ख! कशाचाही संचय नसल्यामुळे, ज्ञानाचा संग्रह नसल्यामुळे, कोणताही बदल नसतो कारण व्यक्ती सातत्याने मृत्यूसह जगत असते.

आपण बसवलेला पहिला दगड धर्मशीलतेचा असला पाहिजे.

*कृष्णमूर्तींनी २६-२७ जानेवारी १९८४ रोजी*
*तोंडी सांगितलेल्या मजकुराची लिखित प्रत*

## वार्षिक संमेलन २०१९

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, ह्या संस्थेचं ह्या वर्षीचं संमेलन ऋषी व्हॅली एज्युकेशन सेंटर येथे, १५ नोव्हेंबर रोजी सकाळी सुरू होऊन १८ नोव्हेंबर २०१९ रोजी दुपारी समाप्त होईल. ह्या संमेलनात 'हिंसा, ओळख आणि परिवर्तन' ह्याविषयी चर्चा होईल.

निवासाची व्यवस्था मर्यादित असल्यामुळे, नोंदणी करताना आधी आलेल्या व्यक्तींना प्राधान्य दिले जाईल. व्यवस्थापकीय सोयीच्या दृष्टीने सहभागी व्यक्तींनी कृपया १४ नोव्हेंबरच्या आधी येऊ नये. निवास, जेवण आणि अभ्यास-साहित्य ह्या तीनही गोष्टींसाठी दर व्यक्तीला रु. ३५००/- भरावयाचे आहेत. एकदा पैसे भरल्यावर ते परत घेता येणार नाहीत. कृपया आमच्या खात्यामध्ये रोकड रक्कम भरू नयेत.

पैसे फक्त ऑनलाईन ट्रान्सफर स्वरूपात भरावे.
K.F.I.R.V.E.C. Institute of Educational Resources
State Bank of India, Society Colony Branch
Madanapalle, Savings Bank : A/c no: 54035227556;
IFS Code : SBIN0040002: Swift Code : SBININBB324

पैसे भरल्याविषयीची माहिती तत्काळ gathering@rishivalley.org ह्या पत्त्यावर पाठवावी. माहिती देताना सहभागींची नावे, पत्ते आणि नोंदणी शुल्क ह्या गोष्टींचा पूर्ण तपशील द्यावा.

नाव-नोंदणी पत्रिका www.rishivalley.org ह्या संकेतस्थळावरून घेता येतील. तपशील भरल्यावर, नोंदणी शुल्काविषयीच्या तपशीलासह पत्रिका, gathering@rishivalley.org ह्या पत्त्यावर पाठवाव्या. नोंदणी-पत्रिका पाठवण्यासाठी पत्ता :
KFI Gathering Committee
Rishi Valley Education Centre, Rishi Valley - 517 352,
Chittoor District, Andhra Pradesh.
Tel : 08571 280622 & 08571/ 280582 / 9493547822

नोंदणी पत्रिका आणि शुल्क स्वीकारण्याची अंतिम तारीख १० ऑक्टोबर ही आहे.

# एकांतवासात असताना...

**प्रश्न:** तुम्ही गेले सोळा महिने इथे एकांतवासाचा अनुभव घेत आहात. आयुष्यात प्रथमच तुम्ही असा अनुभव घेतला आहे. ह्या अनुभवात काही विशेष अर्थ आहे का हे समजून घ्यायला आम्हाला आवडेल.

**कृष्णमूर्ती:** तुम्हाला कधीतरी दूर एकांतात जाऊन शांतपणे राहावं असं वाटत नाही का? तिथे जाऊन आधी घडून गेलेल्या गोष्टींचा मागोवा घेणं - केवळ तेच तेच यांत्रिक जगणं नव्हे - सतत बोलत राहणं, स्पष्टीकरण करणं, विवेचन करत राहणं अशा ह्या जीवनाचा मागोवा घ्यावा असं वाटत नाही का? आपण असं करावं असं कधीच तुम्हाला वाटत नाही का? तुम्हाला आपलं मन शांत असावं असं वाटत नाही का? स्वत:ला सखोलपणे जाणून घ्यावं असं वाटत नाही का? तुमच्यापैकी काही लोकांना आपण हे केलं पाहिजे असं वाटत असतं परंतु आर्थिकदृष्ट्या त्यांना ते शक्य होत नाही. काही लोकांना इच्छा असूनही कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे असं करता येत नाही. अशा प्रकारे, वेगवेगळ्या गोष्टी आपल्या इच्छेआड येत राहतात. पण असे अडथळे आले तरीही एखाद्या शांत जागी बसून चिंतन करणं आणि आयुष्यात तुम्ही जे काही केलं आहे, जीवन ज्या पद्धतीने स्वीकारलं आहे त्याचा मागोवा घेणं चांगलं असतं. जेव्हा तुम्ही असं करता तेव्हा तुम्हाला जे अनुभव येतात ते ओळखीचे वाटत नाहीत आणि ते शब्दात मांडताही येत नाहीत; म्हणूनच मला वाटतं की माझ्या एकांतवासातील अनुभवांचा अर्थ तुम्हाला समजणार नाही. क्षमा करा, पण मला असं वाटतं की तुम्ही जर एकांतवासाचा अनुभव घेतलात आणि योग्य तऱ्हेने चिंतन केलंत तर तुमच्यासाठी तो अनुभव अर्थपूर्ण ठरेल.

मला वाटतं कधी तरी एकांतवासाचा अनुभव घेणं आवश्यक असतं. तुम्ही जे काही करत असता ते पूर्णपणे थांबवणं; तुमच्या श्रद्धा-अनुभव ह्यापासून विलग होऊन त्यांचा नव्याने विचार करणं; विश्वास असो वा नसो, यांत्रिकपणे पुन्हा पुन्हा एकच गोष्ट न करता विराम घेणं - हे जेव्हा घडेल तेव्हा तुमचं मन ताजं होईल. असं तुम्ही कराल का? पण यासाठी तुम्हाला अडथळे, अडचणी यांना सामोरं जायची तयारी करावी लागेल, हो की नाही? तुम्ही यासाठी तयार असलात तर निसर्गाची रहस्यं जाणून घेऊ शकाल आणि सभोवतालच्या वातावरणाला भिडू शकाल; जो ईश्वर तुमची वाट पाहत आहे तेथे पोहोचू शकाल! सत्याला आमंत्रित करता येत नाही - ते आपल्यापुढे अवतरतं. पण आपणच पुरेसे जागृत नसतो - आतंरिक प्रेम आणि यासारखेच इतर तरल अनुभव आणि मानसिक प्रक्रिया यांच्या बाबतीत पुरेसे जागृत नसतो; कारण आपल्या यश आणि इच्छा-आकांशा यांनी आपण पूर्णपणे वेढलेले असतो. अशा सर्व गोष्टींपासून दूर जाऊन काही काळापुरतं एकांतवासात राहणं निश्चितच चांगलं असतं, नाही का? कोणत्याही संस्थेचे सभासद होणं थांबवा. ब्राह्मण, हिंदू, ख्रिस्ती, मुस्लीम अशा वेगवेगळ्या जाती-जमातींचे बिल्ले लावणं थांबवा. पूजा, कर्मकांड दूर सारा आणि काही काळासाठी ह्या सर्व गोष्टींतून मुक्त व्हा - आणि काय होतं ते पहा. एकांतवासात असताना दुसऱ्या कोणत्याही गोष्टीमध्ये गुंतू नका. एखादं नवीन पुस्तक उघडून, नवीन ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करू नका. भूतकाळापासून पूर्णपणे मुक्त व्हा आणि पहा काय घडतं ते! एकांतवासात असताना दुसऱ्या कशातही गुंतू नका.

महोदय, तुम्ही हे केलंत तर त्यात तुम्हाला आनंद मिळेल. अलोट प्रेम, सूक्ष्म आकलन आणि मुक्तीचा प्रत्यय येईल. जेव्हा तुमचं हृदय खुलं असतं तेव्हाच सत्याचा प्रवेश होतो. मग पूर्वग्रहांची कुजबुज, स्वत:च्या अंतरंगातील गोंगाट ऐकू येत नाही; यासाठीच एकांतवासाचा अनुभव घेण्याची गरज असते. दूर एकांतात जाणं, चाकोरीबद्ध जगणं थांबवणं - केवळ बाह्य अस्तित्वाची चाकोरी नव्हे तर मन स्वत:च्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी जी चाकोरी प्रस्थापित करतं, ती सुद्धा थांबवणं आवश्यक असतं.

महोदय, ज्यांना अशी संधी मिळेल त्यांनी जरूर तिचा लाभ घ्यावा. त्यानंतर कदाचित जे जाणीवेच्या पलीकडचं आहे, जे मापता येत नाही ते सत्य म्हणजे काय हे तुम्हाला कळेल; मग ईश्वर ही अनुभवता येण्याजोगी, ओळखीची गोष्ट नसेल, पण कधी कधी तुम्ही न बोलवताही तो तुमच्याकडे येतो; पण हे तेव्हाच घडतं जेव्हा तुमचं मन आणि हृदय पूर्णपणे स्तब्ध असतं, कोणत्याही गोष्टीचा शोध घेत नसतं आणि जेव्हा कोणतीही गोष्ट मिळवायची आकांक्षा तुमच्या मनामध्ये नसते, जेव्हा तुमचं मन प्रगतीच्या शोधात नसतं तेव्हाच देव सापडू शकतो. जर आपण ह्या सर्व गोष्टींपासून मुक्त झालो तर कदाचित तुमच्या इच्छांची कुजबुज थांबेल आणि मग, 'जे येण्यासाठी उत्सुक आहे', ते थेटपणे, खात्रीने तुमच्यापाशी पोहोचेल.

मद्रास, व्याख्यान, ५ जानेवारी १९५२

*The Collected Works of J. Krishnamurti, Vol. VI, pp. 252-253*

---

# अंतर्दृष्टी ही कधीही व्यक्तिगत नसते

ही जागा म्हणजे शिकणं, साधेपणाने जगणं, आंतरिक शिस्तीचं पालन करून काम करणं - कोणत्याही गुरुविना, कोणत्याही नेत्याविना आणि ध्यानाच्या किंवा कामाच्या कोणत्याही प्रणालीविना काम करणं. अशी बरीच माणसं आहेत ज्यांचं चित्त व्यवसाय, कुटुंब आणि त्यांच्या जीवनातील इतर गोष्टी ह्यामुळे विचलित होत असतं, आणि त्यामुळे ती स्वत:ला शिकवणुकीमध्ये पूर्णपणे झोकून देऊ शकत नाहीत. म्हणूनच, प्रत्येक व्यक्ती इथे स्वेच्छेने येते - हवं तर चिंतन करण्यासाठी, शिकवणीचा अभ्यास करण्यासाठी आणि इच्छा असल्यास शारीरिक मेहनतीचं काम करण्यासाठी!

तेव्हा, प्रामुख्याने ही जागा ज्यांना सहकार्याच्या भावनेने एकत्र यावंसं वाटतं त्यांच्यासाठी आहे. सहकार्याची भावना म्हणजे एखाद्या उद्दिष्टासाठी, आदर्शासाठी किंवा अधिकारासाठी एकत्र काम करणं नव्हे. पण एखादी व्यक्ती जेव्हा शारीरिक काम करत असते, तेव्हा त्या व्यक्तीला अचानकपणे सखोल आकलन करून देणारी जाणीव होऊ शकते, जिच्याबद्दल ती व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीबरोबर बोलू शकते; त्या व्यक्तीने सांगितलेल्या गोष्टीबद्दल इतर व्यक्ती प्रश्न विचारू शकतात, शंका उपस्थित करू शकतात. परंतु त्या चर्चेतून दोघांनाही झालेलं गहन आकलन हे कोणा एकाच्याच मालकीचं नसेल.

अंतर्दृष्टी (perception) ही कधीही व्यक्तिगत नसते. दुसऱ्याशी असा संवाद साधणं म्हणजे सहकार.

*ऋषी व्हॅली येथे २४ डिसेंबर १९८३ रोजी कृष्णमूर्तींनी तोंडी सांगितलेल्या मजकुराची लिखित प्रत*

वृ | त्त | वि | शे | ष

# जे. कृष्णमूर्तींची १२५ वी जयंती

११ मे २०१९, पासून जे. कृष्णमूर्तींच्या १२५ व्या जयंती वर्षाची सुरुवात झाली आहे. तुमच्यापैकी काही लोकांना, पंचवीस वर्षांपूर्वी १९९४–१९९५ ह्या कालावधीत, कृष्णमूर्तींच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेले कार्यक्रम आठवत असतील. त्यानंतरच्या कालावधीत आणखी एक पिढी जन्माला आली. ह्या नव्या पिढीतल्या लोकांना कदाचित कृष्णमूर्तींविषयी किंवा शिकवणीविषयी फारशी माहिती नसेल. म्हणूनच ह्या १२५ व्या जयंती वर्षाच्या कालावधीत, कृष्णमूर्तींची आणि त्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनाची नव्या पिढीला आणि अधिक लोकांना ओळख करून द्यावी असं वाटतं. ही शिकवण कालातीत आहे. म्हणूनच आजच्या पिढीतील लोकांचंही तिच्याशी नातं जुळेल आणि त्यामुळे त्यांचं जीवन समृद्ध होईल असं वाटतं.

यासाठीच, कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, चेन्नई, ह्या संस्थेने, त्यांच्यातर्फे चालवल्या जाणाऱ्या सहा शाळा, ह्या शाळांच्या परिसरात आणि अन्य काही ठिकाणी प्रौढांना कृष्णमूर्तींच्या शिकवणीची ओळख करून देण्यासाठी चालवण्यात येणारी अभ्यास केंद्रं, ह्यांच्या सहकार्याने अनेक कार्यक्रमांची आखणी केली आहे. भारतात अनेक ठिकाणी ह्या निमित्ताने जाहीर व्याख्यानं, चर्चासत्रं, कृष्णमूर्तींची व्याख्यानं आणि संवाद यावर आधारित व्हिडिओ, छायाचित्रांची प्रदर्शनं, कृष्णमूर्तींच्या शिक्षणविषयक विचारांची जाणीव करून देणारे कार्यक्रम, नव्या पुस्तकांची आणि भारतीय भाषांमध्ये केलेली भाषांतरांची प्रकाशनं अशा अनेक गोष्टी आयोजित करण्यात येणार आहेत.

वर नमूद केलेल्या गोष्टींविषयीचा अधिक तपशील वेळोवेळी फाउंडेशनच्या विविध संकेतस्थळांवरून, वार्तापत्रांमधून आणि समाज माध्यमांवरून प्रसारित करण्यात येईल.


## पुस्तक परिचय


विद्यार्थ्यांसाठी कृष्णमूर्ती – ह्या मालिकेतील खालील तीन नवीन पुस्तिका लवकरच प्रकाशित करण्यात येत आहेत.


- भावना प्रबळ असू द्या, त्यांचे भय बाळगू नका (Have Strong Feelings- Don't be frightened of them)
- तुमच्यातील सुप्त प्रतिभा ओळखा (Discover Your Hidden Talent)
- कंटाळवाणेपणा आणि करमणुकीचा उद्योगधंदा (Boredom and the Entertainment Industry)

आधुनिक शिक्षण पद्धतीत शालेय शिक्षण संपवून बाहेर पडणारे विद्यार्थी आयुष्यात येणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यात कितपत यशस्वी ठरतील याबद्दल कृष्णमूर्तींना खूप आस्था होती. संपूर्ण जगात ठिकठिकाणी होणाऱ्या त्यांच्या भाषणांतून आणि चर्चांमधून ते भावी जीवनात येणाऱ्या अनेकविध समस्यांकडे तरुणांचे लक्ष वेधत – मग ते तरुण कोणत्याही देशातील आणि कोणत्याही व्यवसायातील असोत.

कृष्णमूर्तींनी त्यांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधले आणि वेळोवेळी त्यांना उद्देशून भाषणंही केली. त्यातील काही उताऱ्यांची संकलनं ह्या पुस्तिकांच्या मालिकेमधून प्रकाशित करण्यात आली आहेत. ह्या मालिकेतील पहिली दोन पुस्तकं याआधीच प्रकाशित करण्यात आली आहेत.




ह्या सर्व पुस्तिका गुजराथी भाषेतूनही प्रकाशित करण्यात येणार आहेत.

किशोरवयीन मुलांसाठी कृष्णमूर्ती – ह्या पुस्तकमालिकेत तीन पुस्तकं आहेत. त्यातील दोन पुस्तकं लवकरच मराठी आणि गुजराथी भाषेतून प्रकाशित करण्यात येणार आहेत.


- काळजी घेणं म्हणजे काय? (What is it to Care?)
- मुक्ती म्हणजे खरोखर काय? (What does freedom mean?)





ही पुस्तकमालिका मुलांना आपल्या आतंरिक विश्वाचा वेध घेण्यास मदत करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आली आहे. मुलांच्या मनात रुतून बसलेले, त्यांना बोचणारे अनुभव, ज्या गोष्टींची त्यांना भीती वाटते अशा गोष्टी, सुखद वाटणाऱ्या गोष्टी, त्यांच्या महत्वाकांक्षा, यश आणि अपयश – अशा सर्व अनुभवांना कसं सामोरं जावं ह्याविषयी इथे कृष्णमूर्ती मुलांबरोबर चर्चा करतात.

'प्रथम अर्थात अंतिम मुक्ती' ह्या अनेक काळ उपलब्ध नसलेल्या पुस्तकाचं पुनर्मुद्रण करण्यात आलं आहे. तसेच भावी जीवन ह्या पुस्तकाचंही लवकरच पुनर्मुद्रण करण्यात येणार आहे. ही सर्व पुस्तकं https://kfimumbai.org ह्या संकेतस्थळावर खरेदी करण्यासाठी उपलब्ध करण्यात येत आहेत.

# मराठी, गुजराथी आणि इंग्रजी भाषांमधून नवीन संकेतस्थळ





कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाच्या मुंबई केंद्राचं नवीन संकेतस्थळ अलिकडेच प्रकाशित करण्यात आलं आहे. ह्या संकेतस्थळाचं वैशिष्ट्य म्हणजे इंग्रजीखेरीज मराठी आणि गुजराथी भाषेतही इथे सर्व माहिति वाचकांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे. तसंच इथे इंग्रजी, मराठी आणि गुजराथी पुस्तकं विकत घेण्याची सोयही आहे. भारत तसंच भारतीय उपमहाद्विपातील देशांसाठी ही सोय मर्यादित आहे.


ह्या संकेतस्थळावर जे. कृष्णमूर्तींनी स्थापन केलेले न्यास (फाउंडेशन्स) आणि तेथील शाळा, अध्ययन केंद्रं व त्यांच्या विविध उपक्रमांबद्दल थोडक्यात माहिति आहे. फाउंडेशनच्या इंग्रजी, मराठी आणि गुजराथी प्रकाशनांबद्दल इथे सविस्तर माहिति मिळेल.


वाचकांना इथे मुंबई केंद्राच्या विविध उपक्रमांविषयी माहिति मिळेल. दर महिन्याला केंद्रातर्फे होणाऱ्या कार्यक्रमांबद्दल वाचकांना येथे पूर्वसूचना देण्यात येतात. पूर्वी झालेल्या काही कार्यक्रमांचे सविस्तर वृत्तांत वाचण्याची संधी उत्सुक वाचकांना मिळेल.

ह्या संकेतस्थळावर दृष्टिबाधित वाचकांसाठी खास प्रकाशित केल्या जाणाऱ्या ब्रेल आवृत्त्या, ध्वनिमुद्रित पुस्तकं, तसंच मोठ्या अक्षरातील आवृत्त्यांबद्दल सविस्तर माहिति उपलब्ध आहे.

केंद्रातर्फे प्रकाशित केल्या जाणाऱ्या वृत्तपत्रिकांचे – मराठी (अंतरलहरी) आणि गुजराथी (अंतरमेळ) – सर्व अंक वाचण्याची संधी येथे मिळेल. कृष्णमूर्तींच्या भाषणांमधील आणि लिखाणांमधील काही विषयवार उतारे मराठी आणि गुजराथीमध्ये वाचण्याचा अनुभव येथे घेता येईल. वाचकांना आंतरजालावर आपल्या मातृभाषेतून कृष्णमूर्तींच्या जीवनदृष्टीचा वेध घेण्याची ही एक विशेष संधी आहे.

www.kfimumbai.org ह्या संकेतस्थळाला जरूर भेट द्या.





## मुंबई केंद्राचे काही कार्यक्रम

### ८ जानेवारी, २०१९

साठे महाविद्यालय, विलेपार्ले येथे तत्वज्ञान विषयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबर चर्चा आयोजित करण्यात आली होती. कृष्णमूर्ती फाउंडेशनतर्फे श्री. अभिजित पडते यांनी ह्या चर्चेचं संचालन केले. 'आपल्या दैनंदिन जीवनात तत्त्वज्ञान ह्या विषयाचं औचित्य' हा ह्या चर्चेचा विषय होता. आपण आपल्या व्यवसाय-क्षेत्राची निवड करताना कोणत्या गोष्टींना प्राधान्य द्यावं हे ह्या विद्यार्थ्यांना जाणून घ्यायचं होतं. श्री. अभिजित यांनी विद्यार्थ्यांबरोबर चर्चा करताना- स्वत:ला प्रश्न विचारणं, कोणत्या गोष्टींमध्ये आपल्याला खरोखर रस वाटतो हे जाणून घेणं, केवळ कोणत्या गोष्टींमुळे जीवन सुरक्षितपणे जगता येईल ह्यालाच प्राधान्य न देता इतर गोष्टींनाही थोडा वाव देणं-वेगळ्या वाटा निवडण्याचा प्रयत्न करणं ह्या गोष्टींचं महत्त्व त्यांना जाणवून देण्याचा प्रयत्न केला. दैनंदिन जीवनात आपण ज्या गोष्टी करतो त्यावरून लोकांना आपल्या जीवनविषयक दृष्टिकोनाची जाणीव होते ह्या गोष्टीकडे त्यांनी विद्यार्थ्यांचं लक्ष वेधलं. अनुभव- स्मृती-विचार-कृती या चक्रातून आपण कसे फिरत असतो हे त्यांनी विशद केलं. सातत्याने प्रत्येक अनुभवाचं परीक्षण करणं, प्रश्न विचारणं आणि स्वत:ला समजून घेता घेता, संपूर्ण जीवनाचाच साकल्याने विचार करणं किती आवश्यक आहे ह्याची जाणीव त्यांनी विद्यार्थ्यांना करून दिली.

### ६ फेब्रुवारी २०१९

'द इंटिग्रल प्लेस' ह्या संस्थेत ६ फेब्रुवारी, २०१९ ह्या दिवशी एक चर्चात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. 'नातेसंबंधांत, एकूण जीवनात खरोखर सुरक्षितता असते का?' हा ह्या चर्चेचा विषय होता. ह्या सत्राचं संचालन, कृष्णमूर्ती लिंक इंटरनॅशनल' ह्या संस्थेचे सदस्य श्री. रमण पटेल यांनी केलं. अनेक विद्यार्थी आणि तरुण ह्या चर्चेत उत्साहाने सहभागी झाले होते. ह्या तरुण सहभागींनी बरेच प्रश्न विचारले आणि श्री. रमण यांनी, उत्तरादाखल प्रतिप्रश्न उपस्थित करून त्यांच्या विचारांना अधिक चालना दिली.

**१६ ऑगस्ट २०१९**

अलिकडे विल्सन महाविद्यालयातील तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यांबरोबर सुरू करण्यात आलेल्या 'पुस्तक-वाचन आणि त्यावर आधारित चर्चा' ह्या उपक्रमातील तिसऱ्या सत्राचं श्री. विनय दाभोळकर ह्यांनी संचालन केलं. त्यांनी ह्या सत्रासाठी 'ह्या गोष्टींचा विचार करा' ह्या पुस्तकामधील 'स्वातंत्र्य म्हणजे काय?' हा भाग चर्चेसाठी निवडला होता. वाचनानंतर चर्चा करताना विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले: स्वातंत्र्यामुळे अनैतिक निर्णय घेतले गेले तर काय होईल? स्वत:च्या मनाचे कैदी होणं चुकीचं का आहे? दुसऱ्या व्यक्तीला समजून घेणं अधिक महत्त्वाचं, अधिक आश्वासक आहे का? कृष्णमूर्ती म्हणतात अनेक लोक स्वतंत्र आहेत पण फारच थोडे मुक्त आहेत- इथे त्यांना नेमकं काय सांगायचं आहे? - विद्यार्थी जीवनाचा गांभीर्याने विचार करीत आहेत, हे ह्या चर्चेतून जाणवलं.

**१४ जुलै, २०१९**

'द इंटिग्रल स्पेस' येथे १४ जुलै, २०१९ रोजी श्री. अभिजित पडते ह्यांनी एका चर्चासत्राचं संचालन केलं. सुरुवातीला श्री. अभिजितनी कृष्णमूर्तींच्या भाषणातील उताऱ्याचं वाचन करीत जगातील सद्यस्थितीचा आढावा घेतला. मानवासमोर असलेल्या अनेक समस्यांना विविध क्षेत्रातील तज्ञ त्या त्या क्षेत्रापुरते तोडगे काढतात - आर्थिक, सामाजिक, तांत्रिक, राजकीय दृष्टीकोनातून विचार केला जातो आणि समस्येची संपूर्ण उकल होऊ शकत नाही. कृष्णमूर्तींनी निर्देश केल्याप्रमाणे कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय समस्येचं सूक्ष्म निरीक्षण करण्यातूनच समस्येचं संपूर्ण आकलन होतं ह्या गोष्टीकडे श्री. अभिजितनी सहभागींचं लक्ष वेधलं. एकंदरीत ह्या चर्चेमुळे सहभागींच्या विचारांची दिशा स्पष्ट होण्यास मदत झाली.

**पुस्तक प्रदर्शन**

मुंबई केंद्राने, सह्याद्री एज्युकेशन सेंटरच्या सहकार्याने, सुरत येथे २४-२८ जानेवारी, २०१९, ह्या दिवसांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या पुस्तक प्रदर्शनामध्ये भाग घेतला होता. वेगवेगळ्या शिक्षण संस्थांनी आपल्या पुस्तक-केंद्राला भेट दिली. संस्थेला या निमित्ताने शिक्षण क्षेत्राशी संबंधित अनेक विषयांवर आणि कृष्णमूर्ती फाउंडेशनच्या शाळांमधील शिक्षण-विषयक दृष्टिकोनाबद्दल चर्चा करण्याची संधी मिळाली.

## जिथे एकात्मता फुलते ती जागा

गेली चौदा वर्षं ब्रॉकवुड येथे ही शाळा आहे. ही शाळा सुरू करताना सुरूवातीला खूप अडचणी आल्या, पैशाची चणचण आणि इतरही काही गोष्टी. आपल्या सर्वांच्या मदतीने ती शाळा आज आहे त्या स्थितीपर्यंत पोचली. इथे संमेलनं, चर्चासत्रं ह्यांचं आयोजन करण्यात येतं. ध्वनीमुद्रण आणि ध्वनीचित्रमुद्रणही करण्यात येतं. आपण आता अशा अवस्थेपर्यंत आलो आहोत की फक्त कामाचा आढावा घेऊन न थांबता ब्रॉकवुडची व्याप्ती शाळेपलीकडे गेली पाहिजे. युरोपमध्ये ब्रॉकवुड हे एकमेव केंद्र आहे जे ह्या शिकवणुकीचं प्रतिनिधित्व करतं, जे मुख्यत्वे धर्मशील आहे.

आता ब्रॉकवुडमधील कार्याच्या आवाक्याचा शाळेपलीकडे विस्तार झाला पाहिजे. ज्यांना ह्या शिकवणुकीत रस आहे त्यांना इथे राहण्याची सोय हवी, त्यांना अभ्यास करता आला पाहिजे. पुरातन काळात आश्रम एकांतवासासाठी होते. आपली ऊर्जा एकवटून लोक तिथे आयुष्याच्या आध्यात्मिक पैलूंचा खोलवर वेध घेण्यासाठी येऊन राहत असत. आता अशा आधुनिक स्थळांवर एखादा गुरू, नेता, मठाधिपती वगैरे असतात. ते तुम्हाला मार्गदर्शन करतात, अर्थ समजावून सांगतात, शेवटी प्रभूत्व त्यांच्याकडे जातं. ब्रॉकवुडला असा गुरू, नेता नसावा. ह्या शिकवणुकीतच त्या सत्याची अभिव्यक्ती आहे. गंभीर विचार करणाऱ्यांनी स्वत:च तिचा शोध घ्यावा. व्यक्तिपूजेला इथे स्थान नाही. आपण ह्या गोष्टीचं महत्त्व अधोरेखित केलं पाहिजे.

दुर्दैवाने आपले मेंदू संस्कारित आहेत. ते संस्कार, परंपरा व शिक्षणाने सीमित झाले आहेत, त्यामुळे आपली ऊर्जाही बंदिस्त झाली आहे. आपण सुखसोई व सवयी ह्यांच्या चाकोरीत बांधले गेले आहोत, त्यामुळे मानसिकरित्या आपला प्रभाव कमी झाला आहे. त्याला प्रतिक्रिया म्हणून आपली ऊर्जा आपण ऐहिक सुखात व स्वकेंद्रित कृतीत खर्ची घालतो. ह्या जुन्यापुराण्या परंपरांपुढे ब्रॉकवुडने झुकता कामा नये. ब्रॉकवुड हे शिक्षणाचं केंद्र आहे. विचारणा करण्याची कला आणि शोध घेण्याची कला आत्मसात करण्याची ही जागा आहे. ही जागा अशी आहे की तिथे प्रज्ञेच्या जागृतीची अपेक्षा आहे - अशी प्रज्ञा जी प्रेम व करुणेसह येते.

हा एक खास वेगळा गट निर्माण होता नये. सर्वसाधारणपणे कोणताही गट म्हटला की त्याची स्वत:ची अशी वेगळी सांप्रदायिक ध्येयं असतात. त्या आदर्शवादाने आणि काहीशा अव्यवहार्य उद्दिष्टांनी ते बांधले जातात.

ब्रॉकवुड ही एक अशी जागा असावी जिथे एकात्मतेचा आणि अत्यंत प्रामाणिकपणाचा प्रत्यय येईल. जगभर चाललेल्या गोंधळात, संघर्षात, विध्वंसात, ब्रॉकवुड हे प्रज्ञाजागृतीचं केंद्र बनलं पाहिजे. हे एका व्यक्तीवर किंवा काही लोकांच्या समूहावर मुळीच अवलंबून असू नये. तर इथे राहणाऱ्या लोकांची सजगता, त्यांचं अवधान आणि स्नेहभाव ह्यांच्यावर अवलंबून असेल. हे ब्रॉकवुडमध्ये राहणाऱ्या व्यक्तींवर आणि कृष्णमूर्ती फाउंडेशनच्या विश्वस्तांवर अवलंबून आहे. हे घडवणं ही त्यांची जबाबदारी आहे.

त्यात प्रत्येकाचा सहभाग हवा. हे ब्रॉकवुडपुरतं नाही तर इतर कृष्णमूर्ती फाउंडेशन्सनाही लागू आहे. पण असं वाटतं की ह्या सर्व गोष्टींवरून आपलं लक्ष ढळेल आणि आपल्या दृष्टीने अधिक गरजेच्या उपक्रमांमध्ये आपण गुरफटून जाऊ. त्यामुळे वेळ अपुरा पडेल आणि ह्या शिकवणुकीविषयी आस्था वाटण्याइतकी खोल तळमळही उरणार नाही. ती तळमळ नसेल तर फाउंडेशन्स निरर्थक ठरतात. तुम्ही ह्या शिकवणुकीवर सतत बोलू शकाल, तिचं स्पष्टीकरण कराल, अर्थ लावाल, तिचं मूल्य ठरवाल. परंतु हे सर्व वरवरचं असेल. तुम्ही प्रत्यक्षात तसे जगत नसाल तर खरोखर त्याला काहीच अर्थ नाही...

...ब्रॉकवुड ही सुंदर जागा आहे. आकाशाला भिडणारे प्राचीन वृक्ष इथे आहेत. ही जागा कुरणं, उपवनं, वाटिका ह्यांनी वेढलेली आहे. निसर्गाच्या निरव शांततेचा इथे प्रत्यय येतो. ही जागा अशीच राखली पाहिजे कारण सौंदर्य म्हणजे एकात्मता, सद्भाव आणि सत्य.

*ब्रॉकवुड येथे २० ऑक्टोबर १९८३ रोजी*
*कृष्णमूर्तींनी तोंडी सांगितलेल्या मजकुराची लिखित प्रत*

# मध्यस्थ कोण निर्माण करतो?

**प्रश्न:** मला वाटतं, लोकांनी तुम्ही काय म्हणता ते केवळ ऐकणं पुरेसं नाही. तुम्ही जे सांगत आहात ते समजून घेण्यासाठी त्यांच्या मनाची तयारी करून घेणं आणि तुमची पुस्तकं आणि शिकवण यांचा काळजीपूर्वक अभ्यास करणं, त्यासाठी अभ्यासगटांचं आयोजन करणंही आवश्यक आहे. अशी पूर्वतयारी केल्यावरच लोकांना तुमची शिकवण नीट समजून घेता येईल. माझं म्हणणं बरोबर आहे ना? तुम्हाला काय वाटतं ते मला सांगा.

**कृष्णमूर्ती:** ह्या प्रश्नामध्ये मध्यस्थ, अर्थ सांगणारा, पुरोहित अध्याहृत आहे, नाही का? 'मला समजतं' परंतु 'इतरांना समजत नाही', 'मला थोडसं समजतं आणि मी ते इतरांना बोलून दाखवलं पाहिजे' - ह्या सर्व वेगळ्या गोष्टी आहेत; म्हणूनच आपण ह्या संपूर्ण प्रश्नाचा सखोलपणे विचार करूया.

मध्यस्थ-अर्थानुवाद करणारा कोण निर्माण करतो? - तुम्हीच! जर तुम्हाला एखादी गोष्ट थेट समजली असेल तर तुम्हाला मध्यस्थाची - अनुवाद करणाऱ्या व्यक्तीची गरज नसते. पण जर मला समजत नसेल तर मी दुसऱ्याकडे मार्गदर्शनासाठी पाहतो; आणि ती व्यक्ती तिच्यावर झालेल्या संस्कारांप्रमाणे, तिच्या क्षमतेनुसार अर्थ सांगते! म्हणजे मीच मध्यस्थ किंवा अर्थ सांगणारा किंवा पुरोहित निर्माण करतो. मी आळशी असतो. मी 'स्व'च्या संबंधी जागृत नसतो. हे इतकं सरळ-सोपं आहे! यासाठी तुम्हाला पुस्तक वाचण्याची गरज नाही, इतकं ते स्पष्ट आहे. तुम्ही ज्या सर्व गोष्टी करत असता त्यावेळी तुम्ही स्वत: सावध-जागृत राहणं, स्वत:चं निरीक्षण करणं - एखाद्या विशिष्ट पद्धतीप्रमाणे नाही, ते निरीक्षण करणं नसतं; फक्त स्वत:चं निरीक्षण करणं, जेवणाच्या टेबलावर, ऑफीसमध्ये, आपण कसं बोलतो ह्याचं फक्त निरीक्षण करणं आणि आपण दुसऱ्याला कसे कमी लेखतो हे पाहणं! तुम्ही कशी तुलना करत असता, कसे निष्ठूर बनता हे सर्व फक्त तटस्थपणे पाहणं - यासाठी कुणा मध्यस्थाची गरज नसते. तुमच्या मनामध्ये काय चाललं आहे, तुमचं मन कसं काम करत आहे हे स्वत:च जाणून घेण्यासाठी - दुसऱ्या कुणा व्यक्तीच्या दृष्टीकोनातून नाही, स्वत:च्या दृष्टीकोनातून जाणून घेण्यासाठी - खरं तर हे फारसं कठीण नाही. पण जर तुम्ही घाबरट असाल, तर तुम्हाला मध्यस्थाची-समुपदेशकाची गरज भासते.

महोदय, अनुसरण करणं वाईट आहे. कोणत्याही प्रकारचं अनुसरण वाईटच असतं. चांगलं अनुसरण आणि वाईट अनुसरण असं काही नसतंच! मग तुम्ही राजकीयदृष्ट्या, धार्मिकदृष्ट्या अनुसरण करत असाल किंवा तुम्ही तुमचे स्वत:चे अनुभव किंवा आदर्श यांचं अनुसरण करत असाल तरीसुद्धा कोणत्याही प्रकारचं अनुसरण वाईटच असतं. कारण त्यामुळे अधिकारशाही निर्माण होते, अनुयायी तयार होतात. ज्या मानसिक अवस्थेमुळे व्यक्ती, 'मला माहीत नाही पण तुम्हाला माहीत आहे, तेव्हा तुम्ही मला सांगा आणि स्वर्गात सुरक्षित जागा द्या', अशा स्थितीपर्यंत येऊन पोहोचते, त्या मानसिक अवस्थेमुळेच मध्यस्थ, अर्थानुवाद करणारे पुरोहित तयार होतात - 'जे आपल्याला वाचवणार असतात'! राजकीय पुढारी, कमिसार किंवा धर्मोपदेशक हे सर्व सारखेच असतात कारण त्यांचे अनुयायी म्हणतात,

*(पृष्ठ ८ वर...*

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,** वसंतविहार, १२४, १२६, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८. • दूरध्वनी : ०४४०-२४९३७८०३/२४९३७५९६ • ईमेल : info@kfionline.org • वेबसाईट : www.kfionline.org • कृष्णमूर्तींच्या भाषणांच्या आणि संवादांच्या अनेक डिव्हिडीज् आता आपण ऑर्डर पाठवून मागवू शकता. ही यादी वेबसाईटवर उपलब्ध आहे. • दर महिन्याच्या तिसऱ्या शुक्रवारपासून रविवार संध्याकाळपर्यंत निवासी अध्ययन शिबीरे आयोजित केली जातात.

9 - 10 February 2019 Tamil Gathering : 'The Challenge of Change'
23 - 24 March 2019 Understanding Human Relationship

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बेंगलुरू :** संपर्क: द स्टडी, व्हॅली स्कूल कँपस, १७ कि.मी. कनकपुरा रोड, थातगुणी पोस्ट, बेंगलुरू-५६००६२.
दूरध्वनी : ०८० - २८४३५२४३ • ईमेल : kfistudy@gmail.com • वेबसाईट : www.kfistudy.org
०५-०८ सप्टेंबर २०१९ Education and the 'Understanding of Life'
०७-१० नोव्हेंबर २०१९ Exploring Happiness & 'the enticing world of Pleasure'?
०४-०८ डिसेंबर २०१९ What are you DOING with your LIFE?

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, राजघाट- वाराणसी:** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, राजघाट फोर्ट, वाराणसी २२१ ००१.
दूरध्वनी: ०५४२ - २४४१२८९ / २४४०३२६ • ईमेल : studycentre@rajghatbesantschool.org • वेबसाईट : www.rajghatbesantschool.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री:** पोस्ट - तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा - पुणे, पिन - ४१०५१३, महाराष्ट्र
दूरध्वनी : (०२१३५) २८७७७२, २८८३४८, २०३४७५ • ईमेल : kfisahyadri.study@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, ऋषी व्हॅली:** जिल्हा चित्तूर, आंध्र प्रदेश - ५१७३५२ दूरध्वनी : : (०८५७१) २८०६२२/ २८०५८२, ९४९३५४७८२२/ ९४९३५४७३२२/७८९३६४४७१७/७८९३६४४४९७ • ईमेल : study@rishivalley.org • वेबसाईट : http://www.rishivalley.org

**KFI चे वार्षिक संमेलन : १५ ते १८ नोव्हेंबर** *(अधिक माहिती पृ. २ वर)*

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, उत्तरकाशी:** पोस्ट रानारी, डुंडा ब्लॉक, जिल्हा उत्तरकाशी - २४९१५१. • ईमेल : krc.himalay@gmail.com
दूरध्वनी : ९४१२४ ३६४२९/९४१५९८३६९० • वेबसाईट : http://www.jkrishnamurtionline.org भारतीय भाषांमधील संकेतस्थळ

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कोलकाता:** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, ३०, देवदार स्ट्रीट, कोलकाता - ७०००१९.
दूरध्वनी : (०३३) ४००८२३९८ • ईमेल : kfikolkata@gmail.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कटक:** ओरिसा, पुरीघाट रोड, तेलेंगा बझार, कटक - ७५३००९, ओरिसा.
दूरध्वनी : (०६७१) ६४१७९९० • ईमेल : kficuttackcentre@gmail.com • वेबसाईट : www.kficc.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर:** आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहाटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे, पिनकोड- ४२१५०३. दूरध्वनी : (०२२) २६६००२२४, २४२२३१९९ • ई मेल : jksesbadlapur@gmail.com • वेबसाईट : www.jkses.org

...पृष्ठ ७ वरून) 'आम्हाला काही माहीत नाही'. हे सर्व कदाचित तुम्ही सर्वांनी यापूर्वीही अनेकदा ऐकलं असेल, तरीसुद्धा जणू हे आज प्रथमच ऐकत आहात अशा दृष्टीने ऐका, ते अर्थपूर्ण वाटेल, त्यात गहनता असेल. पण 'हे सर्व मी शंभर वेळा, हजार वेळा ऐकलं आहे कारण गेली पंचवीस वर्ष मी तुमच्या सहवासात आहे आणि तुम्ही काय सांगणार हे मला माहीत आहे', अशा भावनेने ऐकत असाल तर इथे जे काही सांगितलं जात आहे त्याचा थेट प्रत्यय तुम्हाला येणार नाही, आणि म्हणूनच तुम्ही नुसते शब्द ऐकत राहणं निरर्थक ठरेल.

जोपर्यंत मनाची खात्री पटत नसेल तोपर्यंत तुम्हाला अर्थ सांगणाऱ्यांची गरज भासत राहते; आणि ज्या मनाची खात्री पटत नाही ते कधीही मुक्त नसतं. ते नेहमीच घाबरलेलं असतं. अशा मनाला नेहमीच कोणत्या ना कोणत्या गोष्टीची खात्री पटवून घ्यायची असते– एखाद्या आदर्शाबद्दलची खात्री, एखाद्या नातेसंबंधाबद्दलची खात्री, एखाद्या सत्य गोष्टविषयी खात्री– याचा अर्थ असा की त्यांना एखादा मध्यस्थ हवा असतो; असा मध्यस्थ जो त्यांना मदत करू शकेल. पण जर तुम्ही जे ऐकलं आहे ते तुमच्यासाठी सत्यच असेल – दुसऱ्या व्यक्तीला वाटतं म्हणून नाही, तर तुम्हाला स्वत:लाच त्याच्या खरेपणाविषयी खात्री वाटते म्हणून– तर मग तुम्ही योग्य तेच बोलाल, योग्य प्रकारे नृत्य कराल, तुम्ही योग्य प्रकारे जगाल, प्रेम कराल, निर्मिती कराल; मग तुम्हाला अधिकार निर्माण करण्याची गरज भासणार नाही, मग तुमचे कोणीही अनुयायी नसतील, मग तुमची कोणत्याही समाजाशी बांधिलकी नसेल.

पण आपल्यापैकी बऱ्याच लोकांची ही अडचण असते की नक्की काय करावं हे आपल्याला कळत नाही, आपण गोंधळून जातो, स्वत:मध्येच गुरफटून जातो; आपल्याला मदत हवी असते पण कशी– तर एक आंधळी व्यक्ती दुसऱ्या आंधळ्या व्यक्तीला मदत करेल तशी! पण जेव्हा मी गोंधळून गेलो आहे, नक्की काय करावं हे मला कळत नाही याची मला जाणीव असते, आणि मी त्या अवस्थेत काही काळ राहतो तेव्हा मला मदत मिळते. मी गोंधळून गेलो आहे, ह्याची जाणीव असणं, मला काहीही माहीत नाही ह्याची जाणीव असणं ही स्थिती विनम्रतेचीच असते, नाही का? ही सखोल भावावस्थाच कृतीला चालना देते. जी व्यक्ती काहीही नसते, रिक्त असते ती व्यक्ती बौद्धिक पातळीवर तसं बोलून दाखवत नाही. पण अंतरंगात तिला ह्या गोष्टीची जाणीव असते.

कृपा करून अर्थानुवाद करणाऱ्यांपासून सावध रहा; स्वत:चं रक्षण करा. ते तुम्हाला फक्त खात्री देऊ शकतात; अर्थानुवाद करणारे तुम्हाला मुक्ती देऊ शकत नाहीत. मुक्ती– स्वातंत्र्य हे जेव्हा जगण्याच्या संपूर्ण प्रक्रियेचं भान असतं, तेव्हाच अनुभवता येतं.

मुंबई, प्रवचन, ३ मार्च १९५४

*The Collected Works of J. Krishnamurti, Vol. VIII, pp. 207-208*

**कृष्णमूर्तींविषयीच्या काही वेबसाईटस्:**

www.jkrishnamurti.org
www.kfionline.org
www.rishivalley.org
www.rajghatbesantschool.org
www.kfistudy.org
www.kscskfi.com
www.jkrishnamurtionline.org
www.kfa.org
www.kfoundation.org
www.kinfonet.org
www.kfimumbai.org


**Statement about ownership and other particulars of Antarlahari Newsletter**

**Form IV**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | : | Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006. |
| 2. Peridicity of Publication | : | Once in four months, (January, May, September) |
| 3. Printer's Name | : | P. V. Dabholkar |
| Whether citizen of India | : | Yes |
| Address | : | Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006. |
| 4. Publisher's Name | : | P. V. Dabholkar |
| Whether citizen of India | | Yes |
| Address | : | Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006. |
| 5. Editor's Name | : | Vasanti Padte |
| Address | : | Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006. |
| 6. Name and address of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one percent of the total capital | : | Krishnamurti Foundation India, Mumbai Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Rd., Malabar Hill, Mumbai - 400 006. |

I, P. V. Dabholkar, hereby declare that the particulars given are true to the best of my knowedge and belief.

Sd
(P. V. Dabholkar)


'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.


*Published in January, May, September*

Periodical

*Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259*



*If undelivered please return to :*

**Krishnamurti Foundation India**
Mumbai Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road,
Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com
Websites : kfimumbai.org, kfionline.org, jkrishnamurti.org



*Printed and Published by SHRI P V DABHOLKAR on behalf of KRISHNAMURTI FOUNDATION INDIA, MUMBAI EXECUTIVE COMMITTEE, HIMMAT NIWAS, 31, DONGERSEY ROAD, MALABAR HILL, MUMBAI 400 006. Editor : SMT. VASANTI PADTE Printed at INDIA PRINTING WORKS, 42, G. D. AMBEKAR MARG, WADALA, MUMBAI 400 031.*